

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ७

अंक : ४

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४३
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२१

---

संपादक : श्री. भीमसेनराव माड्याळकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ,** स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- प्रशासकीय क्षेत्रातील मराठी आत्मचरित्रांचा प्रवाह : एक दृष्टिक्षेप / प्रा. समाधान काशिराम सातव ७
- ब्रिटिश राज आणि वडार मजूर : अज्ञात इतिहास / डॉ. जगन्नाथ सावंत १५
- लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांची लोकगीते : साताऱ्याची अस्सल ग्रामगीते / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात २३
- रवींद्र शोभणे यांच्या कथेतील युवादर्शन / प्रा. काशीनाथ तरासे ३९
- देवमाणूस कै. शशिकांत रास्ते / उषा रास्ते ४७
- कीर्तिरूपे 'शेष'/ प्रा. डॉ. सुहास पुजारी ५९
- प्रतिभावंत दिग्दर्शक अकिरा कुरोसावा / सर्वोत्तम सताळकर ७१
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ७९
- श्री हनुमान जयंत / मीनाक्षी बक्षी ८२
- सायबर सुरक्षा काळाची गरज - एक अंतर्दृष्टी / डॉ. अनंत दत्तात्रय चिंचुरे ८८
- मनात घर करणारे पुस्तक : 'मनीमानसी' / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ९४


Scanned with CamScanner

# लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांची लोकगीते : साताऱ्याची अस्सल ग्रामगीते

● प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

## प्रस्तावना

मराठी साहित्यात शाहिरी साहित्याच्या धारेचा प्रारंभ शिवकालापूर्वीपासून आहे, या साहित्याला लोकसाहित्याची पार्श्वभूमी आहे. कारण लोकानुसारी, लोकाश्रयी, लोकानुभवी असा या साहित्याचा सामाजिक पिंड आहे. मराठी साहित्याची ही परंपरा महाराष्ट्रात विशेषत: पेशवेकाळात पुणे - नगर जिल्ह्यात आणि नंतर मराठ्यांची दुसरी राजधानी सातारा या जिल्ह्यात मोठ्या जोमाने आणि गुणवत्तेने जोपासली गेलेली दिसते. सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येचा काळ आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा ३/४ तपांचा काळ शाहीर साबळे व शाहीर पुंडलिक फरांदे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शाहिरीकर्तृत्वाने गाजविला.

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात पोवाडा व लावणीच्या माध्यमातून आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या शाहिरीचा वारसा अनेक शाहिरांनी आपल्या शाहिरीकाव्याच्या आधारे पुढे चालविला. त्या वारसदारांत सातारा जिल्ह्यातील महाराष्ट्रभूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे हे आपल्या सत्यशोधकी शाहिरीने महाराष्ट्रास परिचित आहेत. ते स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुमारे ५० वर्षे लेखन व गायन करणारे कलावंत शाहीर आहेत. १९४१ साली त्यांचे 'आपले कलापथक' रसिकांच्या सेवेसाठी सादर झाले. याच्या माध्यमातूनच त्यांच्या लेखनास सुरुवात झाली. सुमारे दहा पोवाडे, तीन लावण्या, दहा स्फूर्तिगीते, आठ लोकनाट्ये व सुमारे ५० ते ६० लोकगीते; त्यात भारूडे, भलरी गीते, शेतकरी गीते, लग्नगीते असे शाहिरी वाङ्मयातील विविध प्रकार हाताळून त्यांनी मराठी लोकसाहित्याचे दालन समृद्ध केले आहे. शाहिरांची साधी व सोपी भाषा हे त्याचे बलस्थान होते. त्यामुळेच त्यांची ग्रामीण ढंगातील लोकगीते लोकांना जवळची वाटली; त्यांची ग्रामीण सातारी भाषा लोकांच्या मनाला भिडली. मला तर त्यांची



Scanned with CamScanner

लोकगीत म्हणजे सातारी भाषेची अस्सल ग्रामगीते वाटतात.

## साताऱ्याचा फाकडा शाहीर पुंडलिक फरांदे

ग्रामीण साहित्याची व्याख्या करताना गो. म. कुलकर्णी म्हणतात, 'खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील चाली-रीती, तेथील मातीशी-निसर्गाशी असणारे नाते, त्या प्रदेशाची खास वैशिष्ट्ये त्यांचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक जीवन व त्यातून उद्भवणारे प्रश्न यांचे चित्रण करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य म्हणतात.' तर ग्रामीण साहित्य निर्माण होण्याची अपरिहार्यता सांगताना रा. ग. जाधव म्हणतात, '.....ग्रामीणता हा मराठी जीवनाचा सनातन अंगभूत घटक आहे व होता, मराठीसारख्या जिवंत प्रगमनशील वाङ्मयपरंपरेला या घटकाला संपूर्णपणे डावलणे केवळ अशक्य होते आणि त्यामुळे ग्रामीण साहित्य जन्माला आले.'[१] शाहिरांच्या लोकगीतांची निर्मितीही याच प्रेरणेतून झाल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या मातीतील सातारा जिल्ह्यात जन्मलेल्या शाहिरांनी साताऱ्याप्रमाणेच महाराष्ट्रातीलही प्रत्येक सामाजिक प्रश्नाला स्पर्श केला आहे. तळागाळातील समाजाला भेडसावणारे अनेक प्रश्न शाहिरांना अस्वस्थ करीत होते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते अग्रेसर राहिले. राजारामबापू फाळके म्हणतात, 'स्वातंत्र्य संग्रामाच्या कालखंडामध्ये त्यांनी राष्ट्राला राष्ट्रवाद शिकवला. स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी ग्रामीण सुधारणांचा संदेश घेऊन त्यांनी जिल्हा लोकल बोर्डाच्या मदतीने अभिनव ग्रामसुधारणा मोहीम राबवली. प्रतापगडावरील शिवस्मारक व साताऱ्यातील प्रतापसिंह स्मारक यामध्ये शाहिरी बाण्याने त्यांनी या राष्ट्रपुरुषांची अस्मिता महाराष्ट्राला दाखविली. शासनाच्या कुळकायदा, तुकडेबंदी, समाजशिक्षण, अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, हुंडाबंदी, दारूबंदी, अल्पबचत, ग्रामविकास, पंचायत राज्य, कुटुंबनियोजन, हरितक्रांती या योजना आपल्या शाहिरी कार्यक्रमातून विचारमंथन करून सामान्य माणसांना पटवून दिल्या. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये परकीय सत्तेविरुद्ध व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये देशी सत्तेविरुद्ध जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी झगडताना त्यांच्या शब्दांना तलवारीची धार येते. जनतेच्या आंदोलनात शाहिरांनी नेहमीच सैनिकाची भूमिका वठवली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात केवळ शाहीर आघाडीवर होते. तथापि शाहिरांनी राजकारणाचा कधी ध्यास घेतला नाही तर समाजकारणाचा हव्यास धरला. लोकांच्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग जाणून



Scanned with CamScanner

त्यांची दुखणी त्यांच्या बोलीभाषेत मांडली.'[२] प्रस्तुत प्रतिक्रिया म्हणजे शाहिरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो किंवा भारतीय स्वातंत्र्यसंग्राम असो, ग्रामसुधारणा असो की हरितक्रांती, सामाजिक समस्या, असो किंवा राष्ट्रीय समस्या शाहिरांनी समर्पणाने काम केले आहे. 'लोकरंजनातून लोकशिक्षण' हे एकच ध्येय, ध्यास व उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या शाहिराने आयुष्यातील पन्नास वर्षे खर्च केली. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक जडण - घडणीमध्ये शाहिरांचा मोलाचा वाटा आहे. शाहिरांनी आपल्या कलेच्या माध्यमातून समाजात एक वैचारिक क्रांती घडविली. महाराष्ट्र शासनाच्या शासन योजना समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून शाहिरांनी शासन व जनता यांना सांधण्याचा प्रयत्न केला. अशा अनेक वैविध्यपूर्ण कार्यक्रमांतून लोकांचे मनोरंजन करत करत शाहिरांनी नकळतपणे समाजाला लोकशिक्षण दिले आहे. शाहिरांची एक आठवण सांगताना शिवाजीराव पाटील (जिल्हा प्रसिद्धी अधिकारी, सातारा) म्हणतात, 'ग्रामीण भागातील जनतेचे जीवन शाहीर फरांदे यांनी जवळून पाहिले आहे आणि म्हणूनच त्यांच्या जीवनाचे जिवंत चित्र त्यांच्या पोवाड्यांतून पाहावयास मिळते. या संदर्भात पांगरीच्या गजनृत्य पथकास त्यांनी केलेले मार्गदर्शन मला प्रकर्षाने आठवण करून देते. सातारा जिल्ह्यातील गजनृत्य दिल्लीस जात आहे, असे समजताच शाहीर मजकडे आले व म्हणाले, 'आपले हे गजनृत्य महाराष्ट्राच्या खास वैशिष्ट्याने नटले पाहिजे व या दृष्टीने आपण त्याची तयारी केली पाहिजे.' शाहिरांची तळमळ पाहून मी त्यांना पांगरीस नेले. त्यांनी त्या पथकास मार्गदर्शन केले. हातात डफ घेऊन त्यांनी त्यांच्या नृत्यास एक आगळी लय आणून दिली व या नृत्याने खरोखरच दिल्ली गाजविली. केवळ आपल्या महाराष्ट्राच्या लोककलेची वाहवा झाली पाहिजे, या भावनेने त्यांनी या कामात रस घेतला.'[३] असा शाहिरी कलेवर व साताऱ्याच्या मातीवर निस्सिम प्रेम करणारा हा फाकडा शाहीर होता.

## लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांची सातारी भाषेतील ग्रामगीते

शाहीर फरांदे यांच्या एकूण लोकगीतांतून अस्सल ग्रामीण सातारी भाषा व्यक्त करणारी लोकगीते खालील प्रमाणे -

**१. जगताचा त्राता -** आपला देश कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे आपली अर्थव्यवस्थाही कृषीवर आधारित आहे. शेती व शेतकरी हे देशाचे



Scanned with CamScanner

आधारस्तंभ आहेत. 'शेतकरी सुखी, तर जग सुखी' अशी 'म्हण'सुद्धा आपल्याकडे प्रसिद्ध आहे. याच शेतकऱ्याला शाहिरांनी 'जगताचा त्राता' असे संबोधले आहे व तो दु:खी असल्याची खंत प्रस्तुत लोकगीतातून व्यक्त केली आहे. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आज उपाशी आहे. त्याने पिकविलेले धान्य त्याला मिळत नाही, असा उलटा न्याय जगात पसरला आहे. दलाल, व्यापारी, सावकार यांच्या पाशात तो अडकला आहे. 'त्याचं कारण हुडका' असे शाहिरांनी सार्थ आवाहन केले आहे. कारण शेतकऱ्याने पिकविलेल्या कापसापासून कोट्यवधी मीटर कापड बनविलं; पण शेतकऱ्याच्या अंगावर मात्र फाटकी लक्तरंच आहेत. शेतकऱ्याने पिकविलेल्या शेतीमालाच्या व्यापारावर दलाल, आडती, व्यापारी यांनी मोठमोठ्याा इमारती, हवेल्या बांधल्या; पण शेतकरी मात्र हातभर जागा झोपण्यासाठी नसल्याने उघड्यावरच पडतो; शेतकऱ्याने पाळलेल्या गाईपासून दूध, ताक, तूप यांची निर्मिती झाली; पण शेतकऱ्याच्या सणावारालाही यातील थेंबही त्याच्या मुखात वाटणीला येत नाही; काम व कष्ट करण्यासाठी तो सगळ्यात पुढे असतो; पण मानपान व खाण्यापिण्यामध्ये त्याचा नंबर मागचा असतो. असे अनेक गंभीर प्रश्न शाहिरांनी गीतातून विचारले आहेत आणि या सगळ्या प्रश्नांचे एकच उत्तर आहे आणि ते म्हणजे 'अज्ञान' असे वर्णन शेवटच्या कडव्यात केले आहे.

*या सर्वांचे, कारण एक अज्ञानी आहोत*
*ज्ञान घेऊनी करू सहकार्य नांदू संघटित*[४]

प्रस्तुत लोकगीतातून 'याचं कारण हुडका' असे आवाहन करून शेतकऱ्यांना आत्मचिंतन करण्यास प्रवृत्त केले आहे व गीताच्या शेवटी 'अज्ञानी आहोत' असे सांगून शाहिरांनी स्वत:च प्रश्नाची उकल केली आहे. 'अज्ञान' हे सर्व दु:खाचे मूळ आहे हे शाहिरांनी ओळखले होते. त्यामुळे 'ज्ञानी' होऊन व संघटित राहून स्वत:चा विकास साधता येईल असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे. शाहिरांना सर्वसामान्यांची कणव होती. समाजातील प्रत्येक घटकाने सुखी असावे अशी त्यांची तळमळ होती. प्रस्तुत गीतातून त्याचीच प्रचिती येते. शिवाय शेतकऱ्याला 'जगताचा त्राता' असा सार्थ शब्द वापरून व लक्तारं, हुडका असे सातारी भाषेतील ग्रामीण शब्द वापरून व सुरुवातीला प्रश्न विचारून त्याची शेवटी स्वत:च उकल करून शेतकऱ्यांना त्यांच्या दु:खाची जाणीव करून दिली आहे.

**२. संसार असा करावा कसा ?** – वाढत्या महागाईला त्रासलेल्या व नवऱ्याच्या व्यसनाला कंटाळलेल्या एका संसारी स्त्रीचे भावविश्व प्रस्तुत गीतातून शाहिरांनी उलगडले आहे. शाहिरांचे पूर्ण आयुष्य खेड्याात गेल्याने खेड्यातील स्त्रियांच्या व्यथा त्यांना माहीत होत्या. संसार करण्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक गरजासुद्धा ज्यावेळी पूर्ण होऊ शकत नाहीत, त्यावेळी त्या गृहिणीला 'संसार असा करावा कसा ?' हा प्रश्न पडतो. पावसाळ्याच्या तोंडावर घर गळू नये म्हणून ते शेकारलं तर ते बरोबर तिथेच गळतंय, फाटलेलं कापड शिवलं तर ते पुन्हा तिथेच फाटतंय. त्यातच पोराचं दुखणं कितीही औषधपाणी केले तरी थांबत नाही. अशी संसाराची सांधासांध सुरू असताना महागाईने उच्चांक गाठला आहे. धान्यात खडे व गारगोटीची मिसळ, तेलात भेसळ अशा अनेक गोष्टींना ही ग्रामीण स्त्री वैतागली आहे. त्यातच तिच्या नवऱ्याला दारूच्या व्यसनाने वेढले आहे. त्यामुळे घरात सातत्याने वादविवाद सुरू आहेत. नवऱ्याच्या व्यसनामुळे गावात कुणाला उधार मागायची पत शिल्लक राहिलेली नाही. तिच्या समोर उद्याचं काय ? हा प्रश्न तर 'आ' वासून उभा आहेच; पण आजचीही भ्रांत तिला सुटलेली नाही. अशा कचाट्यात सापडलेली ही स्त्री म्हणते, आता 'गप्प बसून, भागणार न्हाई' यावरती उपाय शोधावाच लागेल. अशा रीतीने शाहिरांनी एका संसारी स्त्रीची व्यथा शब्दबद्ध केली आहे. पण ही वीरांगणा शेवटी हार मानून पळपुटे धोरण स्वीकारत नाही. तर खंबीरपणे उभा राहून यातून मार्ग काढण्यासाठी सज्ज होते. अशा प्रकारे शाहिरांचा आशावाद गीतातून व्यक्त होतो. शाहिरांनी गीतात वापरलेले शेकारलं, कापाड शिवलं असे अस्सल सातारी ग्रामीण शब्द व 'बुडत्याचा पाय खोलात' असे वाक्प्रचार गीताची रंगत वाढवितात. शाहिरांनी भ्रष्टाचारावर व महागाईवर केलेले भाष्य समाजातील अपप्रवृत्तींकडे अंगुलीनिर्देश करते व त्यातून शाहिरांचा सूक्ष्म व सारासार विचार दिसून येतो. अशी अनेक (गीताची) कवितेची बलस्थाने असल्याने ही रचना रसिकाच्या अंत:करणाचा ठाव घेते.

**३. अशा कचाट्यात जगायचं कसं ?** – समाजाचे होणारे अध:पतन पाहिल्यावर संवेदनशील मनाच्या शाहिरांना दु:ख होते. प्रस्तुत लोकगीतातून जगणे असह्य झालेल्या सर्वसामान्य लोकांचे वर्णन शाहीर करतात. अन्न, वस्त्र व निवारा ह्या प्राथमिक गरजाही पूर्ण होत नाहीत, हे पाहून त्यांचे मन उद्विग्न होते. लोकांना पोटाला पुरेसं अन्न नाही. झोपायला जागा नाही. त्यातच त्यांना लागलेले व्यसन



Scanned with CamScanner

त्यांचा संसार जाळीत आहे. त्यामुळे 'अशा कचाट्यात जगायचं कसं !' हा प्रश्न त्यांना पडला आहे. तसेच महागाईने केलेला कहर व हरामखोरीला आलेला बहर या कारणांमुळे गोरगरिबांच्या जीवाला घोर पडला आहे. जगणे असह्य झाले आहे. त्यातच समाजात नैतिकता उरली नसल्याने शाळामास्तरांना मुले मारतात, स्वार्थी डॉक्टर विष पाजतात, वकील कुळांना नाडतात व पुढारी मात्र स्वत:चे खिसे नोटांनी भरतात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्येकानेच आपल्या व्यवसायात स्वार्थाला पहिले स्थान दिल्याने समाज भ्रष्ट होत आहे, अशी खंत शाहीर व्यक्त करतात. पण यातून मार्ग काढण्याचा विधायक सल्लाही शाहीर देतात -

*जाणिवेचा इथे, आहे अभाव*
*विचार क्रांतीने, बदलू स्वभाव*
*सहकार्याने लागेल निभाव*
*फरांदे सांगे आपणा हे खास*[५]

भावनाशून्य झालेल्या समाजात जाणिवेचा अभाव दिसतो आहे; पण त्यावर विचारांच्या प्रभावाने मात करता येते, हा सकारात्मक विचार शाहिरांनी दिला आहे. तसेच शाहिरांची सहकारावर श्रद्धा असल्याने कोणतेही काम सहकार्याने होऊ शकते हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे शाहिरांनी शेवटी सहकार्याची कास धरण्याचे आवाहन केले आहे.

शाहिरांच्या प्रत्येक सामाजिक लोकगीतातून समाजाविषयीची तळमळ व्यक्त हाते. त्यामुळेच जगणं नकोसे झालेल्या सामान्यांची व्यथा शाहिरांनी साध्या व सोप्या शब्दांत व्यक्त केली आहे. शाहिरांनी आपल्या गीतांतून वापरलेले ग्रामीण शब्द गीताची परिणामकारकता वाढवितात. उदा. कचाट्यात, शाळामास्तर, कुळ इ. तसेच शाहिरांनी यमकाचा केलेला योग्य वापर गीताला गेय बनवितो. स्वार्थी वकील व डॉक्टर, अप्पलपोटे पुढारी यांच्यावर शाब्दिक कोरडे ओढल्याने सामान्यांना हे गीत स्वत:चे वाटते. शिवाय शाहीर आशावादी व प्रयत्नवादी असल्याने त्यांनी आपल्या प्रत्येक गीतातून समस्येवर मार्ग सुचविला आहे. वैचारिक क्रांती करावी, आव्हान स्वीकारावे, परिवर्तन घडवावे हे त्यांचे विचार समाजाला विधायक दृष्टिकोन देतात. हे शाहिरांच्या गीताचे वेगळेपण आहे.

**४. बिगी बिगी चाल करभारणी !** (बाजारगीत) - शाहिरांनी गायिलेले हे लोकगीत 'बाजारगीत' आहे. गीतातील नायक आपल्या कारभारणीला

कामाची गती वाढविण्याची विनंती करतो. मळ्यातून माल काढायचा असल्याने 'बिगी बिगी चाल' असे म्हणतो. अंजीर, सीताफळ, रामफळ, बोरे, जांभूळ, पेरू, मोसंबी, केळी, संत्री, डाळींब, द्राक्षे ही फळे तर त्याच्या मळ्यात आहेतच शिवाय चाकवत, तांदळी, मेथी, वांगी, मिरच्या, भेंडी, गवार या पालेभाज्या व फळभाज्याही त्याच्या मळ्यात आहेत. तसेच घोसावळे, कारली, काकडी, दोडका, रताळी, मुळा, गाजर व पोराबाळांचा आवडता ऊसही त्याच्या मळ्यात आहे. दुसऱ्या दिवशी गावचा बाजार असल्याने या शेतकऱ्याने आपल्या कारभारणीकडे पाऊल उचलण्याचा हेका धरला आहे. अशा रीतीने हे बाजारगीत लिहून शाहिरांनी शेतकऱ्याची भावना व्यक्त केली आहे. शाहिरांच्या नायकाचे कारभारणीला बिगी बिगी चालण्याचे आवाहन त्याच्या ठायी असणारे कृषिप्रेम व्यक्त करते. 'बिगी बिगी' हा ग्रामीण शब्द वापरल्याने गीताची गतिमानता वाढली आहे.

५. **सोन्याचा दिसआज हाय रं** (सुगीचा आनंद) - शाहिरांनी गायिलेले हे लोकगीत सुगीचा आनंद व्यक्त करते. डुलणारं शिवार व वाऱ्याशी बोलणारे पीक पाहिल्यावर शेतकरी राजा खूष होतो. त्याच्या दृष्टीने तो सोन्याचा दिवस असल्याने तो नाचून आनंद साजरा करतो. कोवळी असणारी रोपं ज्यावेळी हिरवी-पिवळी होऊन पक्व होतात, तेव्हा शेतकऱ्याचा आनंद गगनात मावत नाही. त्याचे शेतीसाठी राबणे कसे अहर्निश चालू आहे ते शाहिरांच्या खालील कडव्यातून व्यक्त होते.

*लाखो लोकांना, देयाला भाकरी*
*धरती मातीची, केलीया चाकरी*
*दिनरात खपलास, उन्हात राबलास*
*घामाचा पाट, हितं व्हाईलास*
*आता औक्षात राम, मिळेल कामाला दाम*
*होईल जगण्याची दुनियेत सोय रं*[६]

शेतकऱ्याचे कष्ट लाखो लोकांना भाकरी देते. धरणी मातेला 'आई' मानून तो तिची सेवा करीत राहतो. त्यातच मेघराजाने त्याच्यावर कृपा केल्याने मातीत सोने पिकल्याचा आनंद त्याला झाला आहे. मेघराजाची दया आणि शेतकऱ्याची मेहनत त्यामुळे त्याच्या पदरात जणू मोत्याचे दाणेच पडले आहेत. हे दाणे पाहून त्याचा उर आनंदाने भरून आला आहे. तो दुःखाला आता घाबरत नाही. हातात मशाल



Scanned with CamScanner

घेऊन सर्वजण नाचून व गाऊन आनंदोत्सव साजरा करीत आहेत.

रात्रंदिवस शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याच्या दृष्टीने सुगीचे दिवस म्हणजे आनंदाचे (सोन्याचे) दिवस असतात. शाहिरांनी समर्पक शब्दांच्या साहाय्याने या आनंदाचे वर्णन केले आहे. शिवाराचे डुलणे आणि पिकाचे वाऱ्याशी बोलणे ह्या कृती मानवी स्वभावाच्या जवळच्या वाटतात. यातून शाहिरांनी शेतकऱ्यांची शिवाराशी असणारी एकरूपता दाखवून दिली आहे. सोन्याचा दिवस, मातीचे सोने, मोत्याचे दाणे या शाहिरांच्या उपमा समर्पक वाटतात. तसेच हा सुगीचा आनंद अभ्यासताना (वाचताना) लोकगीताबरोबरच शेतकऱ्यांनी शेतकरी नृत्य करून फेर धरल्याचे शब्दचित्रही वाचकांच्या डोळ्यांसमोर उभे राहते. शाहिरांची ग्रामीणतेशी असणारी नाळ (दिस, राबलास, औंदा) हे ग्रामीण शब्द प्रकर्षाने दाखवून देतात.

**६. भलरी गीते** - भलरी हा लोकगीताचा एक प्रकार असून शेतकरी आपल्या शेतात काम करताना, विशेषत: ज्वारी, बाजरी, काढणी - मोडणीच्या वेळी म्हणत असतात. हे एक सामूहिक गीत असून शेतकरी रात्रीच्या वेळी एकत्र येऊन एकमेकांना शाळू काढण्यासाठी मदत करतात व हे काम करताना थकवा जाणवू नये व काढणीचे काम लवकर आटोपावे म्हणून भलरी गीत म्हणतात. हे गीत परमेश्वराशी, मुलाबाळांशी, कौटुंबिक जीवनाशी निगडित असते. तसेच त्यात कृषिजीवनाचेही चित्रण असते. शाहिरांनी 'शेती सुधारणा', 'भलं गडी दादा भलं रं', 'शेताला पाणी देताना' अशी तीन भलरी गीते लिहिली आहेत. शाहीर फरांदे यांच्या गीतरचेनत कृषिजीवनाचा आविष्कार आहे. कृषिरंजन आणि कृषिसंस्कार त्यांनी आपल्या रचनेतून साधलेला आढळतो. समकालीन कृषिसमस्या, समाजजीवन आणि राजकारण यांचे रंगतरंगही त्यांच्या गीतरचनेत उमटलेले आहेत.

**अ) शेती सुधारणा** - हे लोकगीत शाहिरांनी जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी लिहिले आहे. शेतकऱ्यांना नाडवणाऱ्या दलालांना बाजूला करून शेती सुधारणा साधणारी ही भलरी आहे. शेतकऱ्यांना आवाहन करताना शाहीर म्हणतात, 'आपल्या जेवढ्या जमिनी असतील तेवढ्या सगळ्या नांगरून काढायच्या व जागोजागी ताली धरून वगळाचं (ओढ्याचं) पाणी अडवायचं, जमिनीत जिथे मुरूम असेल तिथे काळी माती भरायची म्हणजे पीक

चांगले येईल. आपली शेती नांगरून झाल्यावर, कुळवून काढायची त्यामुळे जमीन भूसभूशीत होईल व पिकांना लायक बनेल. आपल्या जमिनीला जेवढे खत लागेल तेवढे आपण तयार करायचे म्हणजे पीक जोमाने वरती येईल व आपली नजर फाटेल. शेतीसाठी आपण चांगल्या बियाणांचा व आधुनिक अवजारांचा वापर करून शिवार बागायत करू या. पिकांवर रोग पडल्यास शेतीखात्यामार्फत माहिती घेऊन औषधे वापरू या व पीक पदरात पाडून घेऊ या. गुराढोरांची वर्दळ वाढल्याने पिकांची नासाडी होऊ नये म्हणून राखण करावी लागेल. सुगीच्या वेळी धान्याची लुटालूट होते, ती थांबवू या; तसेच स्त्रियांना दागिन्यांचा सोस असल्याने शेतकरीण स्त्री आपल्या नवऱ्याकडे सोन्याची ठुशी घेण्याचा आग्रह धरते. असा इतरत्र पैसा खर्च झाल्याने शेतीची सुधारणा करण्याचे राहून जाते. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन घोळ्यामेळ्याने एकत्र धान्य जमवून त्याची विक्री करू या म्हणजे शेतीमालाला योग्य दर मिळेल. सुधारणा साधण्यासाठी नीतीचा मार्ग स्वीकारून एकमेकांच्या सहकार्याने अनेक राष्ट्रे सुधारली आहेत. ते उघड्या डोळ्यांनी बघा आणि शेती सुधारणा करण्यासाठी प्रवृत्त व्हा.' शाहिरांनी 'आपले कलापथक'च्या माध्यमातून हा शेती सुधारणेचा विचार शेतकऱ्यांच्या समोर मांडला आहे.

प्रस्तुत भलरी गीतातून शाहिरांनी परिवर्तनवादी विचार मांडला आहे. शेतीची सुधारणा झाल्यास देशाचा विकास होईल हे माहिती असणाऱ्या शाहिरांनी आपल्या गीतातून शेतकऱ्यांना नवा विचार दिला आहे. 'माल त्याचं हाल' अशी सुबक शब्दयोजना करून शाहिरांनी शेतकऱ्यांना नाडणाऱ्या दलालांना चपराक मारली आहे. तसेच शिवारात डौलाने नाचणारे पीक पाहून 'नजर आपली फाटंल रं' अशी अतिशयोक्ती वापरली असली तरी त्यातून शेतकऱ्यांना होणाऱ्या आनंदाचे दर्शन घडते. 'वगळाचं पाणी', 'गुराढोरांची वरदाळ', 'राम भरोसे रोजगार समदा' असे ग्रामीण शब्द वापरल्याने गीत सुबक झाले आहे.

**ब) शेताला पाणी देताना** (मोटंवरचं गीत) - शाहिरांनी गायिलेले 'शेताला पाणी देताना' हे भलरी गीत असेच एक कृषिगीत आहे. त्यामध्ये शेतात असलेल्या विहिरीवर मोट चाललेली आहे. मोटेतून निघणारे पाणी पाटातून झुळझुळ वाहत शेतात जात आहे. मोट चालविणारा कोणी हौशी धनी आहे. त्याची मालकीण कडेवर लहानग्या तानूला घेऊन येताना दूरवर दिसते आहे. शेतीला जाणारे पाणी पाहून त्याचे मन उत्साहाने व आनंदाने गीत गायला सुरुवात करते.



Scanned with CamScanner

*शेताला पाणी देताना, हो पाणी देताना*
*मज्जा वाटे माज्या मनाला, खरंच मनाला*[७]

त्याचे डोळे शिवारातील पीक आपल्या मनात साठविण्याचा प्रयत्न करतात. त्या मळ्यात असणाऱ्या पिकांचेही वर्णन तो गीतातून करतो. ढवळ्या-पवळ्याचा मोट ओढण्याचा जोश व चाकाचा 'कुईकुई' आवाज त्याच्या साथीला आहेत. त्याची न्याहरी घेऊन येणाऱ्या मालकिणीकडे बघताच ती लाजून पदर सावरते. यानेही पहाटेच मोट धरलेली असल्याने त्यालाही भाकर खाण्याची इच्छा होते व त्या निमित्ताने बैलांनाही चारा व विश्रांती मिळेल, असे त्याला वाटते. या भलरी गीताची भाषा ग्रामीण असून त्यातील शब्दांची योजना अत्यंत समर्पकपणे केली आहे. गीत अर्थपूर्ण असून ते वाचीत असताना आपल्या डोळ्यांपुढे मळा, विहीर, मोट उभी राहते.

**क) भलं गडी दादा भलं रं !** - शाहिरांनी गायिलेले हे भलरी गीत म्हणजे कृषिगीताचा उत्कृष्ट नमुना आहे. शेताची नांगरणी करणारा गणूतात्या, कुळवणारी मुलंबाळं, खुरपणी करणारी हौसाआक्का आणि हालगी वाजवणारा नाऱ्या व्हलार यांचा उल्लेखही गीतातून येतो. चांदण्या रातीत पिकलेली ज्वारी शाहिरांना मोत्यावानी दिसते. तिच्या ताटांचा सळसळ आवाज, आंबराईची झालर, गुलजार शेकोटीचा रंग, गुलाबी थंडी, चंदेरी शालू पांघरलेले आभाळ या सर्व गोष्टी शेतकऱ्याच्या मनाला आनंद देतात. हे भलरी गीत मध्यरात्री डफ-कड्याच्या साथीने म्हटले गेल्याने कामाचा उत्साह वाढून जोमाने काम होते.

प्रस्तुत भलरी गीतातून ज्वारीच्या कणसांना दिलेली मोत्याची उपमा, निसर्गातील रस-रंग-गंधांची केलेली उधळण, गीताला दिलेली वाद्यांची साथ, यमकाचा योग्य वापर व ग्रामीण शब्दांचा चपखल वापर या विशेषणांमुळे वाचकांच्या मनःपटलावर ज्वारीचे डोलणारे शिवार उभे राहते, हे या गीताचे वेगळेपण आहे. अशा प्रकारे शाहिरांनी भलरी गीते लिहून आपल्या लोकगीतांतून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविले आहे.

**७. नंदी बैल आलं गं दारी ।** (नंदी बैलवाला गीत) - शाहिरांनी लोककलाकारांच्या माध्यमातून समाजाचे रंजन करता करता प्रबोधनही केले आहे. नंदीबैलवाला हा एक असाच लोककलाकार. गावात हिंडून लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देत निघालेला हा कलाकार आपल्याला ह्या लोकगीतातून भेटतो. सनई व

गुबु गुबु असा ढोलाचा आवाज करताच नंदीबैल डुलायला लागतो. गावातली सगळी पोरं त्याच्या भोवती गोळा झाल्याने शाळा रिकामी होते. शाळेत मास्तर एकटेच राहतात. शिंगात बाशींग व अंगावर झूल पांघरलेला नंदीबैल दारात येताच आयाबाया त्याला देव समजून ओवाळतात आणि नवस बोलतात. एक स्त्री आयुष्यभर सौभाग्यवती राहावे म्हणून, तर दुसरी पोराच्या लग्नात मिरवायला मिळावे म्हणून नवस करते. यंदा पाऊस पडेल का ? भरपूर पीक येईल का ? हे प्रश्न त्याला ठरलेले असतात. गावातील आळी-आळीतून फिरताना नंदीबैलवाल्याला वेगवेगळा अनुभव येतो. ह्या आळीतील दाजीबा धार काढायला गेल्याने तिथे हळू वाजविण्याची विनंती केली जाते. पण तोपर्यंत आवाजाने गुजरी म्हैस झिंजाडा देते. त्यामुळे दाजिबा शेणात उताणा होतो. त्याची दुधाची चरवी सांडते; पण तरीही खिलाडूवृत्तीने दाजीबाने धोतर पटका देऊन नंदीबैलवाल्याचे यथोचित स्वागत केल्याने तो हरकून जातो व पुढे मार्गस्थ होतो.

लोककलाकारांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जनत केले आहे. त्यात नंदीबैलवाल्याचे स्थान महत्त्वाचे आहे. त्याला लोकगीतात स्थान देऊन शाहिरांनी संस्कृतीच्या जपणूकीस साहाय्य केले आहे. ग्रामीण लोकांच्या मानसिकतेची शाहिरांना चांगली जाण होती. त्यामुळेच नंदीबैलवाला आल्यानंतर त्यांना कोण कोणते प्रश्न विचारले जातात हे त्यांनी ओळखले होते. लहानग्यांचे कुतूहल व स्त्रियांचे भावविश्व प्रश्नांच्या माध्यमातून शाहिरांनी उलगडले आहे. शिवाय शेवटच्या कडव्यात विनोदाचा वापर करून रसिकांच्या हास्यरसाला चाळवले आहे.

कृषिजीवन आणि त्याच्याशी संलग्न असणारे भटक्या विमुक्तांचे जीवन शाहीर फरांदे यांच्या गीतरचनेत प्रतिबिंबित झालेले आहे. त्यात स्वाभाविकता व सूक्ष्मता आहे. धनगरांची मेंढरे, नंदीबैलवाले, माकडवाले, डोंबरी इत्यादी त्यांच्या गीताचे विषय झाले आहेत. सर्वसामान्य जनजीवनात समस्या ठरणाऱ्या प्रथा आणि नाती यावरही शाहिरांनी गीतरचना करून समाजाच्या नजरेत अंजन घातलेले आहे.

**८. थुई थुई आता नाच** (होळी गीत) - महाराष्ट्राची संस्कृती सण-समारंभांतून टिकून आहे. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेला एक सण असतो. फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला 'हुताशनी पौर्णिमा' असे म्हटले जाते. होळी पेटवून हा सण साजरा केला जातो. होळी या सणावर शाहिरांनी लोकगीत लिहिले आहे. शेतीची कामे संपल्याने शेतकरी हा सण उत्साहात साजरा करतात. होळी पेटविणे म्हणजे



Scanned with CamScanner

अंधार दूर करून प्रकाशाचे साम्राज्य प्रस्थापित करणे, वर्षभर शेतीत राबणारा शेतकरी शेतावरील कामाची सजा संपवून, धान्य घरी आणून या दिवशी पुरणपोळी करतो आणि 'थुई थुई' नाचून होळी साजरी करतो. आभाळात पडलेल्या टिपूर चांदण्यांत दांडपट्टा, लेझिमीचा व सूरपाट्यांचा डाव टाकून सगळ्या खेळांचा सराव केला जातो, कारण इथून पुढे गावोगावीच्या जत्रा सुरू होणार असतात. गाव तिथे जत्रा व जत्रा तिथे कुस्त्यांचा फड हे ठरलेले असल्याने त्या फडातही सामील होऊन साऱ्या मुलखात फिरण्याची ह्यांची तयारी आहे. त्यातच सृष्टीच्या मायेत दंग होऊन फाल्गुन महिन्यात सर्व गावकरी नाचून गाऊन होळीचा सण साजरा करतात.

सण-समारंभांतून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन कसे घडते याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रस्तुत लोकगीत होय. शाहिरांच्या समर्पक शब्दयोजनेमुळे वाचकांच्या डोळ्यांसमोर होळी व त्याच्याभोवती फेर धरणारे शेतकरी उभे राहतात. 'सज्या', 'मजा', 'चांनं' (चांदणे) असे ग्रामीण शब्द वापरून शाहिरांनी गीताला सौंदर्य बहाल केले आहे.

९. **करावं तसं भरावं** – शाहिरांनी गायिलेल्या या लोकगीतातून 'करावे तसे भरावे' ह्या म्हणीचे प्रत्यंतर घडविले आहे. आयुष्यभर दारू, जुगार व मटक्यामध्ये वारेमाप पैसा उधळणाऱ्या व्यक्तीची शेवटी कशी वाताहत होते, याचे दर्शन प्रस्तुत लोकगीतातून घडते. त्याच्या सद्य:स्थितीचे वर्णन शाहिरांनी समर्पक शब्दांत केले आहे.

*धोतार पटका खुटीला । उघडा लोळतुया । वटीला ॥*

अशी त्याची दयनीय स्थिती झाली आहे. ऐन उमेदीच्या काळात याचा दारूचा धंदा, जुगार व मटका हे अवैध धंदे जोरदार चालू होते. त्याच्या भागात त्याचा शिरजोर वाढला होता. गुंडगिरी वाढली होती. हजारांच्या नोटा जवळ बाळगून हा गरिबांना वेठीस धरीत होता. दारूच्या व्यसनात सारा गाव डुंबला गेला. घराघरात व आपापसात भांडणे सुरू झाली. घरे दुभंगली, लोकांच्यात वितुष्ट वाढत गेले. घरातील स्त्रिया पुरुषांच्या नावाने ओरडत होत्या; पण त्यांचे मनावर कोण घेणार ? ह्या गावगुंडाला स्त्रियांच्या ओरडण्याकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. गावात हा धनिक असल्याने मोठा पुढारी झाला. गावात राजकारण शिरले. हाणामारीचे गुप्त कट शिजू लागले, ह्याची आरेरावी गावात वाढायला लागली. त्यातच गावच्या



Scanned with CamScanner

जत्रेला ह्याने नाटक आणले, त्यातलीच एक नटी स्वत:कडे रखेल म्हणून ठेवली, अशी अनेक दुष्कृत्ये करीत तो गावातील एक 'ठकसेन' झाला. त्याने भल्याभल्यांचा छळ केला. शेवटी शाहीर म्हणतात,

*'भल्या भल्या केला छळ । केल्या कर्माची ही फळं*
*लागली कोर्टात याला झळं । इवाळतुया या घडीला'*

प्रस्तुत लोकगीतातून शाहिरांनी आयुष्यभर केलेल्या कर्माची फळे भोगणाऱ्या गावगुंडाचे समर्पक वर्णन केले आहे. ग्रामीण भागात पदोपदी 'करावे तसे भरावे' या वापरल्या जाणाऱ्या म्हणीचा शाहिरांनी योग्य प्रकारे वापर केला आहे. गावात गुंडगिरी करणाऱ्याला बायका-मुलांसह सगळेच सोडून जातात. शेवटी तो एकटाच राहतो. शाहिरांनी नकळतपणे अशा प्रकारे वागू नका असाच सल्ला दिला आहे.

**१०. प्रगती** – शाहिरांनी या लोकगीतातून महाराष्ट्रात घडणाऱ्या प्रगतीचा आलेख थोडक्यात मांडला आहे. भारत देशात सुधारणेच्या बाबतीत अग्रेसर असणारे महाराष्ट्र राज्य कसे झोकात सुधारणा करीत आहे हे मी थोडक्यात सांगतो, असे शाहीर म्हणतात. धरणे उभारली, कारखाने व दवाखाने बांधले, नदीचे पाणी आडरानात नेऊन शिवार फुलविले, खेड्याात व शहरात कृषी औद्योगिक सुधारणा केली, कृषिविकास झाल्याने शेतकऱ्यांनी रानात नवी घरे बांधली गुरे-कोंबड्या पाळल्या. त्यातून दूध व अंड्यांचे उत्पन्न मिळू लागले. 'गाव तिथं शाळा' उभी केली, नवनवीन रस्ते तयार केल्याने एस. टी. खेड्यापाड्यात जाऊ लागल्या आहेत, खेड्यात नळयोजनेच्या माध्यमातून पाणी सर्वदूर पोहोचविले, रोजगार हमी योजनेमुळे सर्वसामान्यांना काम मिळाले, शासनाच्या अनेक योजना ग्रामीण भागात पोहोचल्याने खेडी सुधारली, मागासवर्गीयांचा अनेक योजनांच्या माध्यमातून विकास होतोय, ही सर्व प्रगती होण्यापाठीमागे दूरदृष्टी असणारे नेते व सहकाराचे तत्त्व होते, हेही सांगायला शाहीर विसरत नाहीत. गुणवंत नेते व विचारांचे तत्त्व सोबतीला असेल तर विकास, प्रगती नक्की होते, हे शाहिरांना सांगायचे आहे. महाराष्ट्राने अशी देदीप्यमान प्रगती केल्याने त्याचा देशात पहिला क्रमांक लागतो. असे हे सुख व समृद्धीला पोषक असणारे राज्य आहे, असे समाधानाने शाहीर सांगतात.

शाहिरांचे देशावर अपार प्रेम आहेच तसेच महाराष्ट्रावरही निष्ठा, प्रेम व श्रद्धा आहे. गुणगाणासाठी महाराष्ट्र हा विषय व सादरीकरणाला लोकशाहीर पुंडलिक फरांदे असतील तर त्यांना शब्द अपुरेच पडणार आहेत. महाराष्ट्राच्या



Scanned with CamScanner

प्रगतीविषयी 'तुम्हा सांगतो थोडक्यात' असे जरी शाहिरांनी म्हटले असले तरी प्रगतीचा समर्पक आलेख त्यांनी मांडला आहे. तसेच दूरदृष्टी असणाऱ्या गुणवंत नेत्यांची प्रशंसा व सहकाराचे महत्त्व सांगायला शाहीर विसरत नाहीत.

## सारांश

शाहिरांनी गायिलेल्या व संग्रहित केलेल्या लोकगीतांतील सातारी भाषेतील लोकगीतांचा आपण आशयात्मक विचार केला. शाहिरांनी ज्याप्रमाणे लोकगीते गायिली. त्याप्रमाणे भारूडेदेखील गाऊन जनमानसावर आपल्या आवाजाची पकड बसविली आहे. तसेच समाजप्रबोधनपर व स्फूर्तिगीते गाऊन सौष्ठव, सौंदर्य आणि झेप यांचा फार चांगला साक्षात्कार घडून येतो. मराठी भाषेचा अस्सल गोडवा, अस्सल कणखरपणा आणि अस्सल रसाळपणा लोकगीतांमध्ये पाहावयास मिळतो. म्हणूनच शाहिरांची लोकगीतांच्या बाबतीतील कामगिरी अतिशय मोलाची आहे. लोकगीते वेचून प्रसंगानुरूप वाचकांपुढे व प्रेक्षकांपुढे ठेवण्याचे काम त्यांनी निष्ठेने केले आहे. लोकगीते हे समाजाचे धन असते आणि राष्ट्राची संपत्ती असते. त्यामुळे शाहिरांनी 'जुने ते सोने' याचे महत्त्व आपल्या लाकेगीतांद्वारे पटवून दिले. शाहिरांच्या कार्याबद्दल नामवंत चित्रपट दिग्दर्शक दिनकर द. पाटील म्हणतात, 'शाहीर हा भगवंताचा पहिला अवतार आहे, अशी माझी श्रद्धा आहे. समाज बधीरपणे जगत असताना जगण्याचा संदेश शाहिरांनी दिला. क्रांती शब्दांनी होत नाही तोफांनी होते. तोफा जगण्याची चेतना शाहिरांचा डफ देतो. म्हणून डफाची किंमत तोफेपेक्षा अधिक आहे. स्वातंत्र्य चळवळीत लोकशाहीर फरांदे यांनी खेड्यातील समाज जागा केला. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेविरुद्ध न्याय्य हक्कासाठी झगडताना त्यांच्या शब्दांना तलवारीची धार येते. त्यांचे सामाजिक कार्य त्यांच्या बाणेदार आवाजाप्रमाणे भरीव आहे. विशेषतः त्यांची संवाद, बोलण्याची ढब मला विशेष आवडली. त्यांचा प्रत्येक शब्द ग्रामीण वातावरण ढंगात व ठसक्यात व्यक्त करतो.'[१०] शाहीर वास्तवात ग्रामीण जीवन जगले आहेत; म्हणूनच शाहिरांनी लोकगीतांची एवढी मोठी कामगिरी पार पाडली आहे. ग्रामीण भागातील स्त्री-गीते त्यांनी ऐकली आहेत. शेतात उठलेले भावतरंग त्यांनी अनुभवले आहेत. गावात चालणाऱ्या भजनांमध्ये जातीने भाग घेतला आहे. गावातील यात्रा, सण-समारंभ यामध्ये ते एकरूप झाले आहेत म्हणून त्यांनी गाण्याची कला अवगत केली. लोकगीताला शोभेल असा त्यांचा खडा आवाज ही त्यांना मिळालेली उश्वरी देणगी आहे. म्हणूनच त्यांच्या लोकगीतांनी सर्वसामान्य

तसेच नागरी लोकांचे मन आकर्षित करून घेतले. लोकगीते म्हणण्याची विशिष्ट पद्धत असते. मध्येच मोड, खटका घेणे, एकदम खर तोडणे किंवा लांबविणे, एका श्वासात जितके शब्द येतील तितके म्हणणे इ. गोष्टी शाहिरांनी आपली लोकगीते म्हणताना सांभाळल्या आहेत. म्हणूनच त्यांची लोकगीते लोकप्रिय झाली. शाहिरांच्या लोकगीतांच्या बाबतीत कवयित्री शांता शेळके म्हणतात, 'शाहिरांचे अकृत्रिम वागणे, बोलणे, विनोदी स्वभाव व काव्याचे अनिवार प्रेम हे विशेष गुण पहिल्याच भेटीमध्ये जाणवले. याच भेटीत आणखीन एक गोष्ट जाणवली ती म्हणजे त्यांच्या भाषेत टिकाव धरून राहिलेला अस्सल मराठमोळा दणकट सातारी बाज. शाहिरांची कवित्व शक्ती हे त्यांना ईश्वराने दिलेले देणे आहे. त्यांचे काव्य त्यांना जगता जगता गवसले. शाहिरांच्या रक्तातच कविता वाहते. हे लोकशाहीर एकीकडे लोकांची करमणूक करीत असताना दुसरीकडे त्यांचे डोळे उघडून त्यात ज्ञानाच्या अंजनाचे बोटही हळुवारपणे फिरवित असतात. चार दशके शाहीर फरांदे काव्य माध्यमातून विधायक असे समाज संघटनेचे काम अथक करीत राहिले. समाज मन संस्कारित करण्याचे केवढे सामर्थ्य त्यांच्यात आहे.'[११] अशा रीतीने आपल्या गीतांच्या माध्यमातून शाहिरांनी समाज संघटनेचे, समाजाच्या संस्काराचे व समाजाच्या प्रबोधनाचे केलेले कार्य अलौकिक आहे. शाहिरांच्या बाबतीत यावरून स्पष्ट होते की, शाहीर ताल, सूर व लयीत पक्के होते. आपल्या कार्यक्रमात तालसूरांचा मेळ ते चांगला घालत असत. म्हणूनच त्यांच्या गीतांनी आबालवृद्ध, तरुण-तरुणी व तमाम मराठी मनाला भूरळ पाडली आहे. शाहिरांच्या अशा अलौकिक कार्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकशाहीर' ही पदवी बहाल केली आहे.

शाहिरांच्या काव्यनिर्मितीचा परामर्श घेताना प्रकर्षाने आढळलेली गोष्ट म्हणजे, त्यांच्या काव्यातून येणारे अस्सल सातारी ग्रामीण शब्द हे होय. उदा. हुडका, म्होरं, रेंदा, दणका, फुका, ठेचून, धडाका, कचाटा, टोणगा, औक्ष, समदा, वरदाळ, धेंड, हिंडत्याती, गडप, रेटलं, कचाट्यात, पावतर इ. हे शब्द वारंवार त्यांच्या गाण्यांतून येतात.

**समारोप**

शाहिरांची काव्यसृष्टी विविध प्रेरणेतून उभारून आलेली आढळते. सामाजिक, कौटुंबिक प्रेरणा वाचकांचे मन वेधून घेते. शाहिरांचे काव्य हे नृत्य-नाट्य-संगीताने नटलेले आहे. त्यांच्या कवितेला मिळालेली प्रसिद्धी व लोकमान्यता



Scanned with CamScanner

पाहिल्यास जनमानसात शाहिरांना मिळालेले स्थान अधोरेखित होते. त्यांचे पोवाडे, लावण्या, स्फूर्तिगीते व लोकगीते या काव्यप्रकारांनी रसिक श्रोत्यांच्या हृदयसिंहासनावर राज्य केले. शाहिरांच्या या रचनांमुळे समाजाला लोकरंजनातून लोकशिक्षण तर मिळालेच; शिवाय शाहिरीची परंपरा अखंडित चालू राहिली. तसेच शाहिरांच्या रचनेमुळे लोककलेला नवसंजीवनी मिळाली. भारतीय परंपरा, संस्कृती, संस्कार व लोककला यांची नव्या पिढीला ओळख झाली व ग्रामीण शब्दांच्या वापरामुळे ग्रामसंस्कृतीला मराठी साहित्यात स्थान मिळाले. असे शाहिरांचे साहित्यिक कार्य मोठे आहे.

**संदर्भ टीपा**


१. कुलकर्णी गो. म. (संपा.) : नवसमीक्षा (काही विचार प्रवाह), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८२, पृ. क्र. २०४.

२. गुजर जयवंत (संपा.) : स्मरणिका, 'लोकशाहीर फरांदे गुणगौरव समारंभ', दि. २८ सप्टें. १९६९, पृ. क्र. ५८.

३. तत्रैव : पृ. क्र. ७७, ७८.

४. लोकशाहीर फरांदे पुंडलिक : 'लोकगीते' प्रकाशन - सत्यशोधक विद्यार्थी संघ, सातारा प्र. आ. १९९५, पृ. क्र. ३.

५. तत्रैव : पृ. क्र. ७.

६. तत्रैव : पृ. क्र. २१.

७. तत्रैव : पृ. क्र. २४.

८. तत्रैव : पृ. क्र. ४१.

९. तत्रैव : पृ. क्र. ४१.

१०. गुजर जयवंत, संपा. : 'महाराष्ट्र भूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे', स्मरणिका, १९९२, पृ. ३५.

११. तत्रैव : पृ. क्र. ३१.



**- प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**

साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

किसन वीर महाविद्यालय, वाई.

sangramthorat750@gmail.com

भ्रमणध्वनी - ९६०४०४६०८४


★ ★ ★



Scanned with CamScanner